॥ अधिक देखणे तरी निरंजन पाहणे ॥

गायकः पं. भीमसेन जोशी
अभंगः संत ज्ञानेश्वर
संगीतः राम फाटक

अधिक देखणे तरी निरंजन पाहणे
योगिराज विनवणे मना आले वो माये ॥ धृ. ॥

देह बळी देवोनी साधिले म्यां साधनी
तेणे समाधान मज जोडले वो माये ॥ १ ॥

अनंगपण फीटले माया छंदा साठविले
सकळ देखिले आत्मस्वरूप वो माये ॥ २ ॥

चंदन जेवी भरला अश्वत्थ फुलला
तैसा म्यां देखिला निराकार वो माये ॥ ३ ॥

पुरे पुरे आता प्रपंच पाहणे
निजानंदी राहणे स्वरूपी वो माये ॥ ४ ॥

ऐसा ज्ञानसागरू रखुमादेवीवरू
विठ्ठलू निर्धारू म्यां देखिला वो माये ॥ ५ ॥

निरंजनः दिवा
अनंगः मदन, कामदेव
अश्वत्थः पिंपळाचे झाड
प्रपंचः माया, संसार